|| ॐ ||

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

ऑगस्ट २०२२


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org


१५ ऑगस्ट २०२२

## अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनाच्या

## हार्दिक शुभेच्छा

स्वातंत्र्याचा
अमृत महोत्सव



राष्ट्र की जय चेतना का गान वंदे मातरम्
राष्ट्रभक्ती प्रेरणा का गान वंदे मातरम्
बंसी के बहते स्वरोंका प्राण वंदे मातरम्
झल्लरि झनकार झनके नाद वंदे मातरम्
शंख के संघोष का संदेश वंदे मातरम् ।।१।।

सृष्टी बीज मंत्र का है मर्म वंदे मातरम्
राम के वनवास का है काव्य वंदे मातरम्
दिव्य गीता ज्ञान का संगीत वंदे मातरम् ।।२।।

हल्दिघाटी के कणोमें व्याप्त वंदे मातरम्
दिव्य जौहर ज्वाल का है तेज वंदे मातरम्
वीरोंके बलिदान की हुंकार वंदे मातरम् ।।३।।

जनजन के हर कंठ का हो गान वंदे मातरम्
अरिदल थरथर कांपे सुनकर नाद वंदे मातरम्
वीर पुत्रोकी अमर ललकार वंदे मातरम् ।।४।।

# 'स्व'-रूपवर्धिनी भेट... एक भारावलेला अनुभव...

गोष्ट ऐकली होती, देशाच्या नकाशाचे काही तुकडे विद्यार्थ्यांना दिले आणि तो नकाशा बरोबर जोडायला सांगितला. सगळे विद्यार्थी प्रयत्न करत होते पण एका विद्यार्थ्याने मात्र काही मिनिटात नकाशा पूर्ण जोडून दाखवला. शिक्षक म्हणाले, 'काय रे, कसं काय केलं, असं पटकन इतक्या लवकर इतकं छान?' विद्यार्थी म्हणाला, 'सर त्या नकाशाच्या मागे मी बघितलं तर माणसाची आकृती होती मी माणूस जोडला. देश आपोआप जोडला गेला.' 'स्व'-रूपवर्धिनी गेली सुमारे ४३ वर्षे वस्त्यांमध्ये अविरत व बहुविध काम करणारी संस्था. हिरे हे सर्वत्र विखुरलेले असतात. त्यांच्या प्रगतीमध्ये परिस्थिती, गरिबी अडसर ठरू नये यासाठी प्रयत्न करणारी संस्था. वस्तीमध्ये अगदी लहान मुलांसाठी काम, महिलांसाठी प्रशिक्षण वर्ग, मुलींनी त्यांच्या पायावर उभं राहावं यासाठी चालणारे विविध उपक्रम, विविध राज्यातून आलेल्या महिला किंवा इथल्या सुद्धा अनेक महिला यांच्यासाठी चालणारे साक्षरता वर्ग, स्पर्धा परीक्षांसाठी चालणारे वर्ग आणि रत्नांना पैलू पाडण्यासाठी चालणाऱ्या शाखा. त्यातील खेळ, अभ्यास, सहली असे अजून कितीतरी. मुलींचं नर्सिंग शिक्षण पूर्ण झाल्यामुळे, त्या कमवत्या झाल्यामुळे, त्यांच्याच लग्नाच्या बाबतीत त्यांचं देखील मत लक्षात घेणं हा झालेला बदल. स्त्री कमावती झाल्यामुळे घराचं, 'तिचं' पालटलेलं रूप. आज विविध क्षेत्रात अधिकार पदावर असलेले वर्धिनीचे अनेक विद्यार्थी. ७६ वर्षांच्या आजी ज्या गेली २५ वर्ष महिलांना शिकवून साक्षर करत आहेत. वस्तीतली मुलगी जिला वैकुंठ कुठे हेही माहीत नव्हतं त्यांनी भीतीदायक कोविड काळात स्मशानात केलेलं काम, असे कितीतरी अंगावर शहारे आणणारे अनुभव ऐकले. 'सेवा है यज्ञकुंड समाधी सम हम जले', या भावनेने काम करणारे साधेसुधे निगर्वी तरुण, उच्चशिक्षित जीवनव्रती बघून मन भारावले.

**– समर्थ भारत कार्यकर्ता गट**

## शाखा विभाग







◆ **तासिका प्रशिक्षण वर्ग** – ३१ जुलै ला केंद्रीय स्तरावर तासिका प्रशिक्षण वर्ग झाला. या वर्गात सर्व शाखांचे तासिका प्रमुख तसेच शाखेत तास घेणारे सर्व युवक युवती सहभागी झाले होते. प्रशिक्षणात वेगवेगळे विषय, खेळ व प्रयोग घेऊन कसे शिकवायचे हे सांगण्यात आले. यामध्ये विज्ञान, इंग्रजी तसेच गणित या विषयांवर भर देण्यात आला. त्याचबरोबर शिक्षकांनी कोणताही विषय छोटया कृतीतून मुलांपर्यंत कसा पोहोचवावा हे सांगितले गेले.

◆ **स्वामी विवेकानंद शाखा** – गुरुपौर्णिमेनिमित्त शाखेत प्रमुख वक्ते म्हणून श्री. प्रशांत धोत्रे यांना बोलवण्यात आले होते. दादा गोखले नगर वस्ती प्रमुख म्हणून संघ रचनेतून काम पाहत आहेत. प्रशांत दादाने आपण गुरुपौर्णिमा का साजरी करतो, गुरुपौर्णिमेची परंपरा कशी सुरू झाली, आपल्या जीवनातील गुरूंचे महत्त्व याविषयी संवाद साधला.

◆ **समर्थ रामकृष्ण शाखा** – मुलांच्या कलेला वाव मिळाला म्हणून शाखेत गणपती



मूर्ती बनवायची कार्यशाळा घेण्यात आली. ह्या मूर्तीला रंगवून त्याचे घरी पूजन होईल.

◆ **स्वामी सुबोधानंद शाखा** – २८ जुलैला शाखेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम कार्यक्रम घेऊन ARAI टेकडी वर ३० नवीन झाडे लावली. फक्त झाडे लावून उपयोग नाही तर त्या झाडांची देखरेख करणे ही पण जबाबदारी आहे. म्हणून त्यासाठी दर महिन्यातील दोन रविवार हे देखरेख





करण्यासाठी देण्याचा संकल्प शाखेने केला. दि. ३० जुलैला शाळा संपर्कातून नवीन आलेल्या मुलांच्या पालकांची तसेच शाखेतील जुन्या पालकांची सभा घेण्यात आली. शुभम जगताप दादाने पालकांशी संवाद साधला. गुरुपौर्णिमेनिमित्त सुरेश पवार दादाने गुरुपौर्णिमेचे महत्त्व गोष्टीतून सांगितले.

◆ **राजर्षी शाहू महाराज शाखा** – दि. १४ जुलै रोजी शाखेत गुरुपौर्णिमेला कोमल धायरकर ताईंनी आपल्या आसपास असणाऱ्या व्यक्तींमध्ये गुरु शोधता यायला हवा, त्यांच्यातील चांगले गुण आत्मसात करणे हीच खरी गुरुपौर्णिमा असे सांगितले. मार्गदर्शनानंतर नंतर ताईंनी मुलांचे तीन-चार प्रकारचे खेळ घेतले. शाखेतील मोठ्या गटातील मुलांचा शाखेतील सार्थक फाले या वर्धकाच्या गावाला, नांदगाव-मुळशी येथे भातलावणीचा उपक्रम घेतला.

◆ **धर्मवीर शंभुराजे शाखा** – वर्धकांचे युद्ध खेळांचे प्रशिक्षण घेण्यात आले. मुलांचे गट करून पद्यमंजुषा स्पर्धा झाली.

◆ **स्वामी अभेदानंद शाखा** – आपली भारतीय संस्कृती असत्याकडून सत्याकडे जा, अंधारातून प्रकाशकडे जा, मृत्युकडून अमरत्वाकडे जा अशी शिकवण देते.



तेजाचे, प्रकाश देणाऱ्या दिव्याचे महत्त्व जाणून घेण्यासाठी दीप अमावस्येला शाखेत विक्रांत दिघे यांच्या हस्ते दीप पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

◆ **एक राखी ...देशाच्या सीमेवर अहोरात्र जागता पहारा ठेवणाऱ्या शूर सैनिकांसाठी** – आज आपण आनंदाने आपले कौटुंबिक जीवन जगत आहोत कारण आपला भाऊ हातात शस्त्र घेऊन आपल्या संरक्षणासाठी सीमेवर सज्ज आहे म्हणून! राखी पौर्णिमेनिमित्त सीमेवरील जवानांना राखी पाठवण्यासाठी शाखेत राखी बनवण्याचा कार्यक्रम झाला. या राख्या सामजिक भान राखत सैनिकांप्रती असलेले प्रेम व आदर व्यक्त करण्यासाठी त्यांना पाठवल्या.

◆ **भगिनी निवेदिता शाखा** – शाखेत गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रमाला जुने व नवीन सर्व शिक्षक उपस्थित होते. त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करत मुलींनी गुलाबाची फुले देऊन त्यांना अभिवादन केले. ३० जुलैला शाखेत पालक सभा घेण्यात आली. सौ मंजुषा कुलकर्णी यांनी वर्धिनी, शाखा यांचे महत्त्व उपस्थितांना सांगितले. १० ऑगस्टला राखी बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. दर रविवारी नियमितपणे मानसिक विकास बैठक होते, त्यात मनाच्या श्लोकांचे पठण होते.

◆ **क्रांतिज्योती सावित्री शाखा** – दि. २१ जुलैला शाखेची क्षेत्रभेट पर्वतीला झाली. मुलींना पर्वती परिसराची ऐतिहासिक माहिती सांगितली. उपलब्ध वस्तूतून मनोरे, घर, मंदिर अशा आकृती बनवण्याची गटशः स्पर्धा झाली. या गटकामात नेतृत्व, कल्पकता या गुणांना वाव मिळाला.

दि. २९ जुलैला शाखेमध्ये मुलींशी संवाद साधण्यासाठी कवयित्री अर्चना ताई बापट आल्या होत्या. त्यांनी मुलींना कवितेच्या वेगवेगळ्या भाषेतील व्याख्या सांगितल्या. रसग्रहण कसे करायचे हे अत्यंत सोप्या भाषेत सांगितले. दि. १ ऑगस्टला नागपंचमीच्या निमित्ताने शाखेत मुलींसाठी व युवतींसाठी मेहंदी स्पर्धा झाली.

◆ **यशोवार्ता** – स्वामी दयानंद सरस्वती शाखेतील युवक कु. विनायक म्हस्के यांचे इंजिनिअरिंग मधील पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यावर M.Tech in Aerospace मध्ये पुढील शिक्षण घेण्यासाठी Government of India, Department of Space Indian Institute of Space Science and Technology (Thiruvananthapuram, Kerala) या ठिकाणी निवड झाली आहे. या यशासाठी अभिनंदन आणि शुभेच्छा.

## युवा विभाग



◆ **मासिक प्रबोधन वर्ग** – भाग – ४ (गोखलेनगर) – रन राऊंडसच्या स्पर्धेने युवक शाखेची सुरुवात झाली. अनेक दिवसांनी मैदानात घाम गाळून सर्व युवक उत्साहाने सत्रासाठी/प्रशिक्षणासाठी सज्ज झाले. उपक्रमांची व कामाची मांडणी (Presentation), त्याची पूर्वतयारी व प्रकार, फोटो आणि मजकुराचे प्रमाण किती असावे या मुद्द्यांच्या आधारे विक्रांत दिघे सरांनी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन या विषयावर युवकांना मार्गदर्शन केले.

भाग – १ (पेठ परिसर) – भागातील सर्व



शाखांचा व्हॉलीबॉल खेळ झाला. त्यानंतर शुभम जगताप दादाने व्हाईट बोर्ड ॲनिमेशनच्या मदतीने युवकांना स्वतःच्या छंदाची ध्येयनिश्चिती करून त्याचे विश्लेषण SMART - Specific, Measurable, Actionable, Relevant, Time Bound या तंत्राने करून घेतले.

भाग - ३ (कर्वेनगर, सिंहगड रोड) - वर्गाची सुरुवात बुद्धीबळ, कॅरम या खेळांनी झाली. पुणे विद्यापीठातील पत्रकारिता विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रसाद पवार यांनी SWOT Analysis या विषयावर मार्गदर्शन केले.

## समुपदेशन विभाग



दरवर्षी शाखा विभागासाठी मुलांची निवड प्रक्रिया होते. २०२२-२३ या वर्षीच्या शाखा विभागात मुलांची निवड करण्यासाठी पुढील शाळांमध्ये जाऊन निवड चाचणी परीक्षा झाली -

१) प्रतिभा पवार विद्यामंदिर, पौड रोड २) शिशुविहार प्राथमिक शाळा, कर्वे रोड ३) नूतन मराठी विद्यालय ४) नूतन बालविकास मंदिर, सदाशिव पेठ ५) हुजूरपागा शाळा ६) न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड ७) आबासाहेब अत्रे प्रशाला ८) महर्षी अण्णासाहेब शिंदे विद्यालय, घोरपडी पेठ ९) अरण्येश्वर माध्यमिक विद्यालय, पद्मावती वसाहत १०) भावे माध्यमिक विद्यालय.अशा एकूण १० शाळांमध्ये १६८९ मुलांची बुद्धिमापन चाचणी घेण्यात आली. ही चाचणी घेताना शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक व तेथील कर्मचारी वर्गाचे उत्तम सहकार्य लाभले.



## स्पर्धा परीक्षा केंद्र

◆ कारगिल विजय दिनाच्या कार्यक्रमात 'अग्निपथ योजना-समज गैरसमज आणि आंदोलने', ह्याविषयी ब्रिगेडियर श्री. हेमंत महाजन सर (निवृत्त) यांनी मार्गदर्शन केले. कारगिल विजय मोहिमेमधील अनेक अनुभव सांगितले. सैन्यदल भरतीमध्ये महाराष्ट्रातील तरुणांचे प्रमाण कमी का आहे या मुद्द्याकडे त्यांनी लक्ष वेधले व शारीरिक चाचणीमध्ये यशस्वी होण्यासाठी कोणती तयारी, व्यायाम सातत्याने करायला हवेत या विषयी मार्गदर्शन केले.

◆ केंद्राचे माजी विद्यार्थी जे सध्या केंद्र व महाराष्ट्र शासनामध्ये विविध पदांवर उल्लेखनीय कार्य करीत आहेत, अशांनी स्वतःहून पुढाकार घेऊन समर्पण निधी जमा केला. हा निधी केंद्राला आवश्यक असणाऱ्या सुविधांसाठी वापरला जाणार आहे. श्री. विजय गोते व सौ. मनीषाताई नरडेकर यांच्या विशेष संपर्कातून हे साध्य झाले.

## उत्थान विभाग

दि. १० जून ते १२ जून उत्थान विभागाचे पहिलेच शिबिर झाले. शिबिर प्रमुख म्हणून माझी पहिली जबाबदारी होती. एकूण ४७ संख्येनिशी आम्ही अपंग कल्याणकारी शिबिर संशोधन संस्था, वानवडी यथे पोहोचलो. शिबिराला जाताना खूप पाऊस लागला. त्यामुळे थोडीशी धावपळ झाली. उद्घाटन सत्रासाठी श्री. शिरीष पटवर्धन सर व अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष श्री. मुरलीधर कचरे सर उपस्थित होते. पटवर्धन सरांनी त्यांचे पहिल्या शिबिराचे अनुभव सांगत शिबिर नक्की का करावे व त्याचा फायदा काय हे सांगितले. रात्र कार्यक्रमात पद्य मैफल झाली. सकाळी 'मैत्री' या विषयावर श्री. संदीप मोरे सरांचे सत्र झाले. मैदानी खेळांनंतर श्री. योगेश तांबट सरांचे ओरिगामीचे सत्र झाले. श्री. संदीप मोरे, श्री. सुमित डोळे,

श्री. निलेश धायरकर यांचा सहवास कार्यकर्त्यांना मिळाला. दुसऱ्या दिवशीच्या नेतृत्व विकसन सत्रात विविध कृती उपक्रम घेण्यात आले. कला सत्रात हरि धायगुडे दादाने काही व्हिडीओ दाखवले आणि त्यानंतर मुलांनी उपलब्ध ताल साहित्य वापरून गटशः पद्य सादर केली. समारोप सत्रात श्री. विश्वास कुलकर्णी सर व श्रीमती पुष्पाताई नडे यांनी पहिले शिबीर यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले. मी शिबिर नक्की काय असते हे अनुभवले, व्यवस्था नक्की कशा असतात, त्या कशा पद्धतीने पार पाडल्या जातात याचा अनुभव या शिबिराने मला दिला. दहावीच्या मुलांनी सहप्रमुख म्हणून दिलेली जबाबदारी उत्तमरित्या पार पडली. या सगळ्या गटासोबत काम करण्याचा अनुभव नेहमी आठवणीत राहील.

**– मृणाल सुतार**

---

◆ **१० वी व १२ वी कौतुक सोहळा –** विभागातील सर्व अभ्यासिकांमधील १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेल्या मुलांचा कौतुक सोहळा दि. १३ जुलैला वर्धिनीच्या प्रबोध सभागृहामध्ये पार पडला. कार्यक्रमाला संस्थेचे कार्यवाह श्री.विश्वास कुलकर्णी सर, RSB फाऊंडेशनचे श्री. चेतन कुसाळकर उपस्थित होते. मुलांना समाजसुधारकांची चरित्र पुस्तके भेट दिली. त्याचबरोबर त्यांच्या पालकांचेही विशेष कौतुक करण्यात आले. यातून वर्धिनीशी त्यांचे अतूट नाते तयार झाले.

◆ **अभ्यास शिबिर –** इयत्ता १० वी मध्ये शिकणाऱ्या सर्व वर्धक/वर्धिकांसाठी विशेष अभ्यास शिबीर ठेवण्यात आले होते. पहिले सत्र 'लेखन व टिपण', व दुसरे सत्र 'भाषा (इंग्लिश) व परीक्षेची पूर्वतयारी' ह्या विषयावर अमिता आंबेकर ह्यांनी, 'विज्ञान' विषयाचे सत्र लताताई पुरंदरे ह्यांनी आणि गणिताचे सत्र मनीषाताई पाठक ह्यांनी घेतले.



◆ **युवा गट सहल –** दि. २९ जुलैला १० वी पास झालेले वर्धक-वर्धिका, अभ्यासिका प्रमुख व कार्यकर्ते असे ३६ जण किल्ले लोहगडच्या सहलीत सहभागी झाले. गडावर फिरताना गडाची ऐतिहासिक माहिती सांगितली. 'आपली वस्ती – आपले प्रश्न– आपले उत्तर' या उपक्रमात वस्तीत येणाऱ्या समस्या व उपाय यावर युवा गटाने चर्चा केली.

लष्कर भवानी भागात योग दिन साजरा करण्यात आला. श्री. योगेश तांबट सरांनी आपल्या दैनंदिन जीवनामध्ये योग आणि प्राणायाम यांचे महत्त्व मुलांना सांगून प्राणायाम करून दाखविले. सूर्यनमस्कार, कपालभाती, अनुलोम विलोम, भ्रामरी हे प्राणायामाचे प्रकार तसेच गोमुखासन, ताडासन ही आसने मुलांना शिकवली.

३ जुलैच्या मासिक प्रशिक्षणात ३० कार्यकर्ते उपस्थित होते. प्रशिक्षणात उमेश माळेकर दादाने संपर्क का, कधी, कोणाकडे आणि कशासाठी करणे याविषयी चर्चा केली. समुपदेशनाची आवश्यकता कोणाला याविषयी संवाद साधला. श्री. निलेश धायरकर सरांनी कथाकथनाचे प्रशिक्षण घेतले.











---

◆ **सेवेतून सेवेकरी निर्माण –**
उत्थान विभागामधील मंगळवार पेठेतील महाराणा प्रताप अभ्यासिकेमध्ये येत असणारी ९ वीत शिकणारी वर्धिका कु. गौरी बाबर हिला कौटुंबिक कारणाने अचानक दुसऱ्या ठिकाणी राहायला जावे लागले. अंतर वाढले पण अभ्यासिकेची ओढ कमी होत नव्हती. 'दादा, मी आता राहते त्या ठिकाणी अभ्यासिका सुरु करू का ?' असा दादाचा पिच्छा पुरवून तिने शेवाळवाडी, हडपसर या ठिकाणी तिच्या राहत्या वस्तीमध्ये २५ मुलांची अभ्यासिका चालू केली आहे. या अभ्यासिकेत ५ वी ते ८ वी पर्यंतची मुले येतात.

# महिला विभाग

### आणि तिने कात टाकली...

महाराष्ट्रात कातकरी ही एक अजूनही भटकं जीवन जगणारी जमात आहे. मुळशी तालुक्यातील बेलावडे या गावात या कातकऱ्यांची काही घरं आहेत. सगळी घरं मातीची. शेतावर मजुरी हे जगण्याचे त्यांचे साधन. शिक्षणाचा गंध नसल्यामुळे व्यसनाधीनतेचे प्रमाण अधिक. अशा या पार्श्वभूमीमध्ये राहणाऱ्या सहा कातकरी मुलींनी माले येथील सुरू असलेल्या नर्सिंग वर्गाला प्रवेश घेतला. त्यामधील एक मुलगी **करिश्मा हरी जाधव**. दहावीच्या पुढे शिकायची इच्छा असूनही घरच्यांनी तिला नर्सिंग वर्गाला पाठवण्यास नकार दिला होता.

आई, वडील, भाऊ, बहीण असे कुटुंब. अज्ञान आणि पिढीजात दारिद्र्य यामुळे रोजचं जगणंच कष्टमय होतं. रोजंदारीवर त्यांचा उदरनिर्वाह सुरू होता. अशा आर्थिक चणचणीच्या परिस्थितीत मुलीला वर्ग करण्यास कसे पाठवावे असा प्रश्न त्यांच्यासमोर होता. कशीबशी करिश्माची दहावी झाली होती. अशा संघर्षात जाणाऱ्या आणि पुढे शिकायचं स्वप्नं बघणाऱ्या करिश्माला पालकांची परवानगी मिळावी म्हणून नर्सिंग वर्गाच्या शिक्षिका अथक प्रयत्न करत होत्या. सलग पाच दिवस त्या करिश्माच्या घरी जाऊन तिला व तिच्या पालकांना रुग्ण सहायक वर्गाचे महत्त्व पटवून देत होत्या. शेवटी तिच्या पालकांनी करिश्माला रुग्ण सहाय्यक वर्गात प्रवेश घेण्यासाठी परवानगी दिली व तिने वर्गाला (२०२१-२२) प्रवेश घेतला.

वसतीगृहात राहत असताना दुसऱ्या मुली आपल्याशी जुळवून घेतील का, त्यांच्या नजरा आपल्याकडे बघताना कशा असतील म्हणून करिश्मा अबोल असायची. कोणाशी जास्त बोलत नसे पण हळूहळू ती मोकळेपणाने बोलू लागली आणि वसतिगृहात तिला नव्या मैत्रिणी मिळाल्या. एकजुटीने, प्रेमाने एकत्रित राहू लागल्या. करिश्मा हळूहळू मैत्रिणींमध्ये रमू लागली. अभ्यासातही मैत्रिणी तिला मदत करू लागल्या. आर्थिक विवंचनेने ग्रासलेली, गावाबाहेर राहण्याची सवय नसलेली करिश्मा इतर मुलींबरोबर विचारांची देवाण-घेवाण करू लागली. अभ्यासात लक्ष देऊ लागली. अनेक अडचणींवर मात करून करिश्माने रुग्ण सहाय्यक वर्ग पूर्ण केला. आज करिश्मा 'हेल्थ फाऊंडेशन' या हॉस्पिटलमध्ये चांगल्या पगाराची नोकरी करीत आहे, तिच्यासारख्या कातकरी वस्तीत राहणाऱ्या मुलींसाठी ती प्रेरणास्थान बनली आहे. 'इच्छा तिथे मार्ग' असतोच हे तिने समाजाला दाखवून दिले. तिच्या घरातील आणि वस्तीतील लोकांना आज तिचा खूप अभिमान वाटत आहे.

**- सौ.सुनिता गंगावणे**

# रुग्ण सहाय्यक वर्ग

◆ **माले वर्ग** - दि. ५ जुलैला वर्गाचा उद्घाटन सोहळा पार पडला. प्रसिद्ध चित्रकार मा. रवी देव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच सुदर्शन कंपनीच्या CSR विभागातील सौ. वैशाली मुळे व टाटा पॉवर CSR विभागातील सौ. कल्पना हबडे हे मान्यवर उपस्थित होते.

वर्गाला एकूण ३० मुलींनी प्रवेश घेतला. या कार्यक्रमाला २०२१-२२ ह्या वर्गातील दोन विद्यार्थिनी उपस्थित होत्या. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. 'कातकरी समाजात शिक्षणाचा अभाव असल्यामुळे आज मला परिचारिका म्हणून एक नवीन ओळख मिळाली. आज आमच्या समाजात आमचा मान वाढला', असे करिश्मा जाधवने सांगितले.

प्रमुख पाहुणे श्री. रवी देव 'स्व' रूपवर्धिनीच्या या वर्गाचे वेगळेपण सांगताना म्हणाले, 'तुम्ही शिकत असलेल्या संस्थेच्या नावाप्रमाणेच तुमच्या स्वरूपाचे वर्धन होईल. कोरोना काळात एका नर्सिंग कॉलेजमधून GNM झालेल्या मुलीने गावातील प्रवासाची साधने नसल्याने एका गरोदर स्त्रीचे सुखरूप बाळंतपण घरीच केले. अशा अनेक उदाहरणांतून सेवेची प्रेरणा मिळत राहते.' सौ. वैशालीताई मुळे व सौ. कल्पनाताई हबडे ह्यांनी मुलींचा उत्साह वाढवण्यासाठी या वर्गाचे फायदे समजावून सांगितले. त्यानंतर पुष्पाताईंनी मान्यवरांचे आभार मानले. प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला. १३ जुलैला वर्गात गुरुपौर्णिमेला राष्ट्रीय सर्वांगीण विकास संस्थेच्या कार्यकर्त्या अनुराधा चौधरी, स्वातीताई कदम व टाटा पॉवरच्या कल्पनाताई उपस्थित होत्या. अनुराधा ताईंनी ओंकार व प्राणायाम उपासनेचे महत्त्व सांगून मुलींकडून प्राणायाम करून घेतला. कल्पनाताईंनी वसतीगृहातील विद्यार्थी दशेतील त्यांचे प्रेरणादायी अनुभव सांगून गुरुशिष्याचे नाते स्पष्ट केले. वर्गातील मुलींनी पद्य सादर केले.

◆ **पुणे वर्ग** - पुण्याचा वर्ग दि. ८ जुलैला सुरु झाला. ४० मुलींनी वर्गाला प्रवेश घेतला आहे. उद्घाटन कार्यक्रमात श्रीमती पुष्पाताई नडे व श्री. विश्वास कुलकर्णी सरांनी मुलींना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'या वर्गामुळे तुम्हाला सेवेची उत्तम संधी मिळाली आहे. एक चांगले कौशल्य तुमच्या हाती येणार आहे. या कामातील जबाबदारी ओळखून तुम्ही काम कराल तर कामाचा आनंद निश्चित मिळेल.'

# पाकोळी बालवाडी

◆ **आषाढी एकादशी** - पंढरपूरच्या वारीनिमित्त वर्धिनी ते कण्वाश्रम विठ्ठल मंदिर येथे निघालेल्या पालखी सोहळ्यात मोठ्या गटातील व बालशाखेतील मुले सहभागी झाली. विठ्ठल-रुक्मिणी, ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्ताबाई, वारकरी अशा वेशभूषेत नटून आलेल्या मुलांबरोबर उत्साही पालकही ज्ञानोबा-तुकारामांचा, विठ्ठलाचा गजर करून पालखीबरोबर चालत होते. बालशाखेच्या मुलांनी चौकाचौकात रिंगणात पारंपारिक वारकरी खेळांचे सादरीकरण केले. मंदिरात बालशाखेतील वर्धिका कु. श्रावणी गुळंबे हिने 'कोरोना व स्वच्छता' या विषयावर कीर्तन सादर केले. परिसरातील नागरिकांनी थांबून पालखीचे दर्शन घेतले.

श्रावण महिन्यातील सर्व सण बालवाडीत साजरे होतात. त्यातून आपल्या संस्कृतीची ओळख मुलांना करून दिली जाते.

दि. १३ जुलै - गुरुपौर्णिमेला महर्षि व्यास प्रतिमेचे पूजन झाले. गुरु-शिष्य नाते, गुरुगृही जाऊन शिक्षण घेणे, आश्रमात राहणे या गोष्टी मुलांना समजाव्यात म्हणून दृकश्राव्य माध्यमातून संगणकावर त्यांना गोष्टी दाखवल्या. त्यामुळे वर्गातील फळ्यांवर काढलेली चित्र मुलांच्या लक्षात आली. मनिषाताई व मोनालीताईंनी गुरुगीत सादर केले.

दि. २८ जुलैला दीप अमावस्येच्या दिवशी वेगवेगळ्या प्रकारचे दिवे स्वच्छ करून पाटावर मांडून त्यांची पूजा झाली. मोठ्या समईला साडी नेसवल्याने सजावटीला उठाव आला. मुलांनी दिव्यांचे श्लोक व गाणे म्हटले. आश्विनीताईंनी दिव्यांचे उपयोग व महत्त्व स्व-रचित गोष्टीतून सांगितले.

प्रत्येक महिन्याच्या २९ तारखेला मुलांचे त्या महिन्यातील वाढदिवस साजरे होतात. या दिवशी छोट्या गटातील पालकांना आमंत्रित केले. त्यांनी मुलांचे औक्षण करून त्यांना भेटवस्तू दिल्या.

सर्व गटातील मुले आता बालवाडीत रमली आहेत. परिपाठातील श्लोक, गाणी म्हणतात. नियोजनाप्रमाणे अभ्यास, पाठांना सुरुवात झाली आहे.

# मातोश्री रमाबाई आंबेडकर मातृशक्ती पुरस्कार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन आणि 'स्व'-रूपवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षीचा चौथा मातोश्री रमाबाई आंबेडकर पुरस्कार **श्रीमती सुनिता सुनील लांजेकर** यांना ज्येष्ठ मूर्ती शास्त्रज्ञ व डेक्कन कॉलेजचे माजी कुलगुरु आदरणीय डॉ. गो. ब. देगलूरकर यांच्या शुभहस्ते दि. १६ जुलै रोजी प्रदान करण्यात आला. वर्धिनीच्या ओंकार सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. राजेश पांडे, अधिसभा सदस्य व टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे, वर्धिनीचे कार्याध्यक्ष श्री. रामभाऊ डिंबळे व अध्यासन प्रमुख डॉ. सुनील भंडगे उपस्थित होते. या पुरस्कारात रु. ५००० तसेच सन्मानचिन्ह, समता सप्तक याचा समावेश होता.

'श्रीमती सुनिता लांजेकर यांनी अडचणीवर मात करून उपजत कलांचा वापर करून ऐतिहासिक पगड्या बनवण्याचे प्रशिक्षण घेतले. आजही त्या पगड्या बनवतात. अत्यंत अवघड परिस्थितीत पतीच्या अपघाती निधनानंतर न डगमगता त्यांनी मुलांना उत्तम चारित्र्य, अपार कष्टाची तयारी, उत्कृष्ट व ऐतिहासिक साहित्याचे वाचन, चिंतन करण्याचा मनस्वी आग्रह तसेच अखंड ज्ञानलालसा उत्पन्न करण्याची त्यांची चिकाटी इत्यादी गोष्टींमुळे त्यांची या पुरस्कारासाठी केलेली निवड अतिशय योग्य आणि समर्पक आहे. 'निर्माणोंके पावन युग मे, हम चरित्र निर्माण न भुले' याचे दर्शन या पुरस्काराने झाले आहे. आई मुलाला घडवते, मुलांनी राष्ट्र घडवले पाहिजे, याची आज नितांत गरज आहे. मराठी चित्रपटसृष्टी, रंगभूमी व दूरदर्शन मालिकांचे दिग्दर्शक, लेखक, गीतकार, आणि कलाकार असलेल्या दिग्पाल लांजेकर सारख्या कर्तृत्ववान मुलामुळे आईला होणारा आनंद शब्दातीत आहे' असे डॉ. देगलूरकर म्हणाले.

सत्काराला उत्तर देताना मुलाखतीत विचारलेल्या विविध प्रश्नांना सुनिताताईंनी मोकळेपणाने उत्तरे दिली. त्या म्हणाल्या, 'वेगवेगळ्या प्रकारच्या पगड्या तयार करून मुलांची फी भरत, त्यांची वाचनाची आवड पूर्ण करण्यासाठी खूप प्रयत्न केले. दिग्पालला नाटकाची आवड होतीच. तो दुसरीत असताना चारोळ्या करायचा. त्याचं बालपण काळवंडू दिलं नाही. कितीही मोठे झालात तरी आपले पाय जमिनीवरच असले पाहिजेत हा माझा आग्रह त्यांनी मनोमन मानला. आज मराठी चित्रपटसृष्टीत दिग्पालला अनेक पुरस्कार मिळत आहेत. हे बघून मला खूप आनंद होतोय.'

'आज 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये माझ्या आईचा सन्मान होतो आहे. त्यामुळे आमच्या कुटुंबासाठीही हा खूप मोठा आणि आनंददायी क्षण आहे. देगलूरकर सरांच्या हस्ते आईला हा महत्त्वपूर्ण पुरस्कार मिळतो आहे. तो मला ऑस्करपेक्षाही मोलाचा वाटतो' असे भावपूर्ण उद्गार दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी काढले. आजच्या कार्यक्रमाला समाजातील, सुप्रतिष्ठित, अध्यासनाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, वर्धिनीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## अभिनंदन... अभिनंदन... अभिनंदन...

◆ 'स्व'-रूपवर्धिनीचे सहकार्याध्यक्ष **डॉ. संजय तांबट** यांचा गोव्याचे मुख्यमंत्री मा. श्री. प्रमोद सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. Orientation Program for Journalism या कार्यक्रमात सरांनी 'Changing Media Environment... Challenges & Opportunities in Contemporary Journalism' या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. आनंद नरसिंहन (Editor of CNN and News 18) यांनीही या कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन केले.

◆ कमवायचे किती आणि कशासाठी, नोकरी, व्यवसाय सांभाळून उरलेला वेळ कोणासाठी द्यायचा, आपले गुण, कौशल्ये कुठे वापरायचे या सर्वांचे वर्धिनीच्या उद्दिष्टाला समर्पित कृतीयुक्त उत्तर म्हणजे **श्री. संदीप मोरे.** नुकतीच 'पुणे मिरर'या वृत्तपत्राने मध्ये वर्धिनीच्या या कार्यकर्त्याने 'समता प्रतिष्ठान' या नावाने सुरू केलेल्या सेवा कार्याची दखल घेतली. वर्धिनीच्या संस्कारातून तयार झालेला हा युवक कार्यकर्ता वस्त्यांमध्ये अभ्यासिका, संस्कार वर्ग असे अनेक उपक्रम प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबवित आहे. आपल्या कामातून समाजातील समस्यांना भिडणारी माणसे तयार होत आहेत याचा अभिमान वाटतो.

## नवी प्रकाशवाट

वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा विभागातील समन्वयक **श्री. प्रकाश संदिपान करांडे** यांची लेखा व कोशागार, कोकण विभागात 'लेखा लिपीक' पदावर निवड झाली.

प्रकाश मूळचा बीड जिल्ह्यातील ढेकनमोवा गावचा. १० वी पर्यंतचे शिक्षण गावातच झाले. गणित व विज्ञान विषयातील आवडीने पुढील शिक्षणासाठी तो बीडमध्ये आला. घरची परिस्थिती खूपच बिकट असल्याने यापुढील शिक्षण स्वत:च्या हिंमतीवर पूर्ण करण्याचे त्याने ठरवले. मनात शिक्षणाचा ध्यास असल्याने तीन वर्षे एकही दिवस सुट्टी न घेता ३५० - ४०० घरात वर्तमानपत्रे टाकून आर्थिक भार उचलून त्याने बी.एस्सी.ची पदवी मिळवली.

२०१७ पासून तो आपल्या केंद्रात आला आणि विभागात समन्वयक म्हणून काम करत स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. घरचं दारिद्र्य दूर करायचं ही एकच इच्छा मनी बाळगून तीन वर्षातच २०१९ च्या राज्य सेवा परीक्षेत त्याने यश मिळवले. प्रकाशच्या या यशामुळे केंद्रातील अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणेची नवी प्रकाशवाट नक्कीच मिळेल.

## श्रद्धांजली

◆ वर्धिनी युवती विभाग प्रमुख सौ किरण भट्टड यांचे वडील, माहेश्वरी बालाजी मंदिराचे माजी कोषाध्यक्ष **श्री. जसराज काळूराम राठी** यांचे निधन झाले.

◆ वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. मयूर शेडगे यांच्या आजी **श्रीमती जनाबाई राघोबा शेडगे** यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.**